नि.फौ.ख.क्र.८९/२०२६
सरकार/दत्तात्रय हजारे.
**नि.क्र.**

# दोषारोप

मी अश्विनी जोतिराम बाचुळकर, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आटपाडी यांचे न्यायालयात

आपण आरोपी

**दत्तात्रय धोंडीबा हजारे**
वय : ५३ वर्ष, धंदा : शेती
रा. स्वतंत्रपुर जवळ, आटपाडी, ता.आटपाडी, जि.सांगली

यांजवर दोषारोप ठेवते तो असा की,

१. तुम्ही आरोपी दिनांक १९/०९/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वा. चे सुमारास स्वतंत्रपुर जवळ, आटपाडी, जि.सांगली येथे **वर्दीदार सविता दत्तात्रय हजारे म्हणजेच तुमची पत्नी** यांना दारू पिवून काही कारण नसताना भांडण काढून काठीने तिच्या मांडीला, डोक्यावर, हातावर मारहाण करुन जखमी करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचवली आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१) प्रमाणे गुन्हा केला, की जो या न्यायालयाचे कार्यक्षेत्रात आहे.

२. तुम्ही आरोपी वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी वरनमूद नामे वर्दीदार यांना इच्छापूर्वक लाथाबुक्यांनी मारहाण केली आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११५(२) प्रमाणे गुन्हा केला, की जो या न्यायालयाचे कार्यक्षेत्रात आहे.

३. तुम्ही आरोपी वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी वरनमूद नामे वर्दीदार यांचा जाणीवपूर्वक अपमान केला की जेणेकरुन त्यांच्याकडून कोणतातरी अपराध घडावा असा त्यामागे उद्देश होता व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३५२ प्रमाणे गुन्हा केला, की जो या न्यायालयाचे कार्यक्षेत्रात आहे..

४. तुम्ही आरोपी वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी वर्दीदार यांना फौजदारीपात्र धाकदपटशा केली, जेणेकरून त्यांना इजा, भय किंवा धास्ती निर्माण होईल असे कृत्य केले आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३५१(२) प्रमाणे गुन्हा केला, की जो या न्यायालयाचे कार्यक्षेत्रात आहे.

५. तुम्ही आरोपी वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी वर्दीदार यांना जिवे मारण्याची धमकी दिली, ज्यामुळे त्यांना मृत्यूची भीती निर्माण होईल असा धाक दाखविला आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३५१(३) प्रमाणे गुन्हा केला, की जो या न्यायालयाचे कार्यक्षेत्रात आहे.

वरील कलमान्वये शिक्षेस पात्र गुन्ह्याकरीता आपणा विरुध्द खटला चालविला जाईल.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2026.07.31 16:32:48 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक :३१/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

वरील दोषारोप आरोपीला त्याचे मायबोलीतून वाचून व समजावून सांगितला.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2026.07.31 16:32:51 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : ३१/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी